महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर- ४१६००४.

क्र.कोविमं/उच्च.माध्य.व माध्य.परीक्षा / 5732
दिनांक: - २८/११/२०२०

प्रति,

१) मा.उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,कोल्हापूर

२) मा.जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी
जिल्हा माहिती व प्रसिध्दी कार्यालय,
सातारा/सांगली/कोल्हापूर

३) मा.संचालक,
आकाशवाणी केंद्र, सातारा/सांगली/कोल्हापूर

४) मा.व्यवस्थापक
रेडिओ मिरची एफ एम व टोमॅटो एफ एम,कोल्हापूर

५) मा.संचालक,बी न्यूज व एस.पी.एन. न्यूज,कोल्हापूर

६) मा. वृतपत्र संपादक,
दै.पुढारी/सकाळ/तरुण भारत/लोकमत/पुण्यनगरी/महाराष्ट्र टाईम्स ऑफ इंडिया
सातारा/सांगली/कोल्हापूर.

**विषय : उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) २०२१ च्या परीक्षेसाठी खाजगीरित्या प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन नावनोंदणी अर्जास नियमित शुल्काने मुदतवाढ देणेबाबत...**

महोदय,

सन २०२१ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र **(इ.१०वी)** परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नावनोंदणी अर्ज (फॉर्म नं.१७) ऑनलाईन प्रक्रियेव्दारे नियमित शुल्काने स्विकारण्यासाठी मुदतवाढ देण्यासंदर्भातील प्रकटन सोबत जोडले आहे. सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृतपत्र, वृत्तवाहिन्या,आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रानी बातम्याच्या वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी हि विनंती.

आपला विश्वासू

( श्री. एस.एम.आवारी )
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे-०४
## कोल्हापुर विभागीय मंडळ,कोल्हापूर
### * प्रकटन *

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र ( इ. १० वी ) परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना खाजगीरित्या फॉर्म नं.१७ भरून परीक्षेस प्रविष्ट होण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

त्यानुसार २०२१ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी )परीक्षेस खाजगीरित्या (फॉर्म नं.१७) प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नावनोंदणी अर्ज (फॉर्म नं.१७) ऑनलाईन प्रक्रियेद्वारे नियमित शुल्काने भरण्याबाबत मुदतवाढ देण्यात येत आहे. त्यासाठी खाली नमूद केलेल्या सूचनानुसार कार्यवाही करावयाची आहे. .

१. इ.१० वी व इ. १२ वी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्याच्या मुदतवाढीबाबतच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र | नियमित शुल्काने नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्यासाठी तारखा | तपशील |
|---|---|---|
| १ | **रविवार** दिनांक **२९/११/२०२०** ते<br>**बुधवार** दिनांक **३०/१२/२०२०** | विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरणे. |
| २ | **सोमवार** दिनांक **३०/११/२०२०** ते<br>**गुरूवार** दिनांक **३१/१२/२०२०** | विद्यार्थ्यांनी मूळ अर्ज,ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीच्या दोन छायाप्रती व मुळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या संपर्क केंद्र शाळेत / कनिष्ठ महाविद्यालयामध्ये जमा करणे. |
| ३ | **मंगळवार** दिनांक **०५/०१/२०२१** | संपर्क केंद्र शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे अर्ज,ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीची एक छायाप्रत, मुळ कागदपत्रे व यादी विभागीय मंडळाकडे जमा करणे. |

२. खाजगी विद्यार्थ्यांनी इ.१० वी व इ. १२ वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

३. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी खालील वेबसाईटचा वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी/इंग्रजीमधून उपलब्ध आहेत त्या वाचून अर्ज भरण्यास सुरूवात करावी.

**संकेतस्थळ - इ. १० वी -** **http://form17.mh-ssc.ac.in**

इ. १२ वी - **http://form17.mh-hsc.ac.in**

४. विद्यार्थ्यांने ऑनलाईन अर्ज भरण्याकरीता १) शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत) ,मूळप्रत नसल्यास व्दितीयप्रत व प्रतिज्ञापत्र २) आधारकार्ड ३) स्वत:चा पासपोर्ट आकारातील फोटो स्वत:जवळ ठेवावा. ऑनलाईन अर्ज भरताना सदर कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावयाची आहेत.

५. कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्कॅनर/मोबाईलव्दारे कागदपत्रांचे फोटो काढून ते अपलोड करावेत. विद्यार्थ्याचा मोबाईल क्रमांक व **ई-मेल आयडी व पुढील संपर्कासाठी अनिवार्य (compulsory) आहे.**

६. संपूर्ण अर्ज भरुन झाल्यावर भरलेल्या अर्जाची प्रत विद्यार्थ्याला त्याने अर्जात नमूद केलेल्या ई-मेल वर पाठविली जाणार आहे. तसेच या संपूर्ण भरलेल्या अर्जाची प्रिंटआउट, शुल्क पावती व हमीपत्र यासह दोन प्रतीत काढून घ्यावी.

७. विद्यार्थ्यांनी अर्ज , विहित शुल्क ाची पावती व मूळ कागदपत्रे नाव नोंदणी अर्जावर नमूद केलेल्या संपर्क शाळा / कनिष्ठ महाविद्य ालयामध्ये विहित मुदतीत जमा करावयाची आहेत.

८. खाजगी विद्यार्थ्यासाठी नावनोंदणी शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे-

**इ.१० वी - रू.१०००/- नोंदणी शुल्क + रू.१००/- प्रक्रिया शुल्क (processing fee)**

**इ.१२ वी - रू.५००/- नोंदणी शुल्क + रू.१००/- प्रक्रिया शुल्क (processing fee)**

९. अ) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची नावनोंदणी ऑनलाईन होणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यांस त्याच्या पत्त्यानुसार व त्याने निवडलेल्या माध्यम निहाय संपर्क केंद्राची यादी दिसेल त्यापैकी एका संपर्क केंद्राची निवड विद्यार्थ्यांनी करावयाची आहे. या संपर्क केंद्राने प्रकल्प,प्रात्यक्षिक परीक्षा, तोंडी परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन, श्रेणी विषयासंदर्भातील कामकाज करावयाचे आहे.

ब) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी ) परीक्षेस प्रविष्ट होणा-या खाजगी विद्यार्थ्यांनी नावनोंदणी ऑनलाईन करावयाची आहे. नावनोंदणी करताना विद्यार्थ्याचा पत्ता, त्याने निवडलेली शाखा व माध्यम निहाय त्यास कनिष्ठ महाविद्यालयाची यादी दिसेल त्या मधील एका कनिष्ठ महाविद्यालयाची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे. या कनिष्ठ महाविद्यालयाद्वारे परीक्षा अर्ज,प्रकल्प, प्रात्यक्षिक/तोंडी श्रेणी परीक्षा दयावयाच्या आहेत.

१०. इ. १०वी, इ. १२ वी सन २०२१- खाजगी विद्यार्थी फॉर्म नं, १७ ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क ऑनलाईन पध्दतीने **( Debit Card / Credit Card/ UPI/ Net Banking )** द्वारे **भरणे अनिवार्य राहील. ऑनलाईन पध्दतीने शुल्क जमा केल्यानंतर विद्यार्थ्याला पोचपावती प्राप्त होईल. सदर पोचपावती स्वत:जवळ ठेवून त्याच्या दोन छायाप्रती संपर्क केंद्राला देण्यात याव्यात. तसेच एकदा नावनोंदणी अर्ज सादर केल्यानंतर कोणत्याही कारणास्तव नाव नोंदणी शुल्क विद्यार्थ्याला परत केले जाणार नाही तसेच नाव नोंदणी अर्जात दुरुस्ती करावयाची (उदा. माध्यम,शाखा,संपर्क केंद्र अथवा अन्य कारणास्तव ) असल्यास विद्य ार्थ्यास पुन:श्च नाव नोंदणी शुल्क जमा करावे लागेल याची विद्यार्थ्यानी नोंद घ्यावी.**

११. दिव्यांग विद्यार्थ्यांना खाजगीरित्या प्रविष्ट व्हायचे असेल तर त्यांनी त्यांच्या दिव्यांगत्वाचे जिल्हा शल्य चिकित्सकांच्या/ प्राधिकृत केलेल्या हॉस्पिटलच्या प्रमाणपत्राची छायाप्रत प्रमाणित करून अर्जासोबत सादर करावी. व आवश्यकतेनुसार विभागीय मंडळ/कनिष्ठ महाविद्यालय/ संपर्क केंद्र यांचेकडून माहिती प्राप्त करून घ्यावी.

१२. ऑनलाईन अर्ज भरताना कोणतीही तांत्रिक अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत दुरध्वनी **क्र.०२०-२५७०५२०८/२५७०५२०७/२५७०५२७१** वर संपर्क साधावा.

१३. विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र ऑनलाईन देण्यात येणार आहे याची नोंद घ्यावी. तसेच विद्यार्थ्यांनी अर्जासोबत छाननीसाठी दिलेली मूळ कागदपत्रे संपर्क केंद्र / कनिष्ठ महाविद्यालयांकडून निर्धारित कालावधीनंतर परत घेवून जाण्याची दक्षता घ्यावी.

१४. पात्र विद्यार्थ्यांना नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे (Examination form) मंडळाने विहित केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक आहे याची नोंद विद्यार्थ्यांनी घ्यावी.

दिनांक-२७/११/२०२०

( श्री. एस.एम.आवारी )
विभागीय सचिव,
कोल्हापुर विभागीय मंडळ,कोल्हापूर